सिव्हील अपील क्र. ३४४५/२०११ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., विरुध्द राज्य शासन व इतर या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई यांना रु. १००.०० कोटी थकहमी पोटी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्र.ससाका २०१६/प्र.क्र.१७५/३-स,
मंत्रालय, सहावा मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० मार्च, २०१९.

सदंर्भ:

१. शासन निर्णय क्र.ससाका २०१६/प्र.क्र.१७५/३-स, दिनांक ०४ मे २०१८.
२. मा. क्लेम कमिटीचा दिनांक ३०.०१.२०१९ रोजीचा अहवाल.
३. सिव्हील अपील क्रमांक ३४४५/२०११ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक २७.०३.२०१९ रोजीचे आदेश.
४. सरकारी वकील मा. सर्वोच्च न्यायालय यांचे दिनांक २७.०३.२०१९ रोजीचे पत्र.
५. शासन पत्र समक्रमांक दिनांक २८.०३.२०१९.
६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र. पुनर्वि २०११९/ प्र.क्र. १७/१९/१७-स, दिनांक ३०.०३.२०१९ व शासन शुध्दीपत्रक क्र. पुनर्वि २०११९/ प्र.क्र. १७/१९/१७-स, दिनांक ३०.०३.२०१९

प्रस्तावना:-

सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या व कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सन १९९३ पासून विविध प्रकारची कर्जे दिली आहेत, सदर कर्जाना राज्य शासनाने वेळोवेळी हमी दिली होती. सदर संस्था बँकेची परतफेड करू शकल्या नाहीत त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने वेळोवेळी हमी आवाहनीत केली होती. याविषयीच्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे सिव्हील अपील क्रमांक ३४४५/२०११ दाखल केली आहे.

सिव्हील अपील क्रमांक ३४४५/२०११ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसारश्री. एस.जे. वजीफदार, सेवानिवृत्त न्यायाधिश, पंजाब व हरीयाणा व श्री. यु.एस. पालीवाल, सेवानिवृत्त एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर, भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई यांची द्विसदस्यीय क्लेम समिती नियुक्त केली होती . सदर क्लेम कमिटीने दि.३०.०१.२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालय, राज्य शासन व इतर याचिकेकर्ते यांना अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दिनांक २७.०३.२०१९ रोजी सुनावणी झाली आहे. दि.२७.०३.२०१९ रोजीच्या निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांना अदा करावयाच्या रक्कमेबाबतचे शेड्युल सादर करावे असे निर्देश दिले आहेत. सदर आदेशास अनुसरून दिनांक ३१.०३.२०१९ पूर्वी रक्कम रूपये १००.०० कोटी/-(रुपये शंभर कोटी फक्त)

एवढा निधी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई यांना अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखलसिव्हील अपील क्रमांक ३४४५/२०११ मध्ये दि.२७.०३.२०१९ रोजी झालेल्या सुनावणी मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने रक्कम रु.१००,००,००,०००/-(रुपये शंभर कोटी फक्त) एवढा निधी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस मंजूर व वितरीत करण्यास खालील अटीच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

" या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेल्या रू.१०० कोटी रक्कमेचा विनियोग मा. क्लेम्स समितीने दिलेल्या अहवालातील खेळते भांडवली मध्यम मुदत कर्ज (WCTL) बाबत बँकेची मागणी J(११) मधील क्लेम्स समितीने मान्य केलेल्या मुद्दलाला प्रथम वर्ग करावे व शिल्लक रक्कम बँकेची मागणी J (९) मधील समितीने मान्य केलेल्या कर्ज खात्याच्या मुद्दलाला वर्ग करावी".

०२. सदर निधी मागणी क्रमांक व्ही-२, २४२५ सहकार, ००१ संचालन व प्रशासन, ०१ संचालन व प्रशासन, (०१)(०८)साखर आयुक्तालयाचे बळकटीकरण (अनिवार्य) १३, कार्यालयीन खर्च (२४२५१०५४) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या तरतुदीमधून अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

०३. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम रु.१००,००,००,०००/-(रुपये शंभर कोटी फक्त) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, लि. मुंबई यांना अदा करण्यासाठी प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी रक्कम आहरित करुन संबंधितांना अदा करण्याची कार्यवाही दि.३१.०३.२०१९ पूर्वी त्वरीत करावी.

०४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २१२/२०१९/व्यय-२, दिनांक २९.०३.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३३०१७०२०५७१०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing Tax Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.03.30 17:04:35 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)
उपसचिव (साखर) महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल महोदय यांचे खाजगी सचिव.

२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (मुळ स्वाक्षरीच्या १० प्रतींसह)
११.महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१२. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
१३. पणन संचालक, पुणे.
१४.वस्त्रोद्योग संचालक, नागपूर.
१५.प्रादेशिक सहसंचालक (साखर) सर्व
१६.विभागीय सहनिबंधक (प्रशासन) व (लेखापरीक्षण) सर्व
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१८. अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई.
१९. सहसचिव / उपसचिव वित्त विभाग-व्यय-२/अर्थबळ/ अर्थोपाय/अर्थसंकल्प, मंत्रालय, मुंबई.
२०. अवर सचिव/कक्ष अधिकारी (१७स, २४स, २स व २५स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१.निवडनस्ती ३-स